वनक्षेत्राच्या महसूली अभिलेख / गाव नमूना ७/१२ मधील भोगवटदार सदरी वनक्षेत्राच्या नोंदी घेण्याबाबत कालबध्द कार्यक्रम व त्यानुषंगाने मार्गदर्शक सूचना...

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक - एस-१०/२०२६/प्र.क्र. १७०/वने-०३ (फ-३)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २३ एप्रिल, २०२६.

**वाचा:-** १) महसूल विभागाचे शासन परिपत्रक क्र.एस-३०/२००४/प्र.क्र.२००/ल-६, दि.२२.०२.२००५.
२) महसूल विभागाचे शासन परिपत्रक क्र.एस-३०/२००४/प्र.क्र.२००/ल-६, दि.१४.०७.२००५.
३) या विभागाचे शासन परिपत्रक क्र.एस-१०/२०११/प्र.क्र.१७५/फ-३, दि.२.०१.२०१२.

**प्रस्तावना :**

वर्धा-नांदेड-यवतमाळ या रेल्वे प्रकल्पाचा आढावा मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षते खालील दि.२३/०१/२०२६ रोजीच्या प्रगती आढावा पूर्वचर्चा बैठकीत घेण्यात आला. सदर आढाव्यादरम्यान वनक्षेत्राची अचूक नोंद संबंधित महसूली अभिलेख ७/१२ सदरी नसल्यामुळे प्रकल्प अंमलबजावणीमध्ये दिरंगाई झाल्याचे तसेच प्रकल्पाचा खर्च वाढल्याचे देखील निदर्शनास आले. सदर पार्श्वभूमीवर महसूली अभिलेख ७/१२ सदरी वन विभागाच्या क्षेत्राची नोंद घेण्याची मोहीम तातडीने राबवावी, असे निर्देश मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी दिले आहेत.

२. नमूद करण्यात येते की, राज्यातील एकूण वनक्षेत्रापैकी काही क्षेत्र वन विभागांच्या ताब्यात / अधिपत्याखाली आहे तर काही क्षेत्र महसूल विभागाच्या ताब्यात आहे. सदर दोन्ही विभागांची जमिनींचे अभिलेख ठेवण्याची कार्यपध्दती विभिन्न आहे. राज्यभरात जमिनींच्या मालकीबाबतच्या नोंदी महराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये विहीत केल्यानुसार महसूल विभागाच्या अधिपत्याखालील "महसूली अभिलेख (७/१२)" व्दारे नियंत्रीत केल्या जातात. तसेच वनक्षेत्राचा अभिलेख वन विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयांव्दारे वन नोंदवहींमध्ये (Form No.१) ठेवला जातो. तथापि, विविध प्रकरणांमध्ये वन क्षेत्राबाबतच्या महसूली नोंदी अद्यावत नसल्याकारणाने वनक्षेत्राची खरेदी विक्री, अतिक्रमण, वनेत्तर वापर यासारख्या बाबींमुळे न्यायालयीन प्रकरणे उद्भवत आहेत. त्याचप्रमाणे वनक्षेत्राबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने विविध याचिकांच्या सुनावणीमध्ये वनजमिनींच्या नोंदींबाबत पारित केलेल्या निर्देशांचे पालन न होऊन मा.सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होण्याची शक्यता देखील निर्माण होत आहे.

३. सर्वसामान्यत: वनक्षेत्राचे ढोबळमानाने संरक्षित वने, राखीव वने, खाजगी वने, वनसदृश्य क्षेत्र, वाटप वनक्षेत्र इ. वर्गीकरण आहे. तथापि, सदर क्षेत्राच्या महसूली अभिलेखातील नोंदी अद्यावत नसल्याकारणाने सदर क्षेत्रावर अतिक्रमण तसेच खरेदी विक्रीच्या बाबी आढळून येत आहेत. त्याचप्रमाणे शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, सन १९८० पूर्वी किंवा काही प्रकरणात त्यानंतर देखील अधिसूचीत वन जमिनी विविध कारणांस्तव वेगवेगळया प्रयोजनांसाठी वाटप करण्यात आलेल्या असून सदर वाटप वनक्षेत्रांचे वेळोवेळी निर्वनीकरण होणे अपेक्षित असताना देखील निर्वनीकरणाची कार्यवाही पुर्ण न झाल्यामुळे सदर वाटप वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा "वनक्षेत्र" राहीला आहे. तथापि, सदर वाटप क्षेत्राच्या महसूली अभिलेखामध्ये मात्र बदल होऊन त्यावरील "वन" च्या नोंदी कालांतराने लोप पावल्या आहेत. व त्याऐवजी वाटप लाभार्थी यांची नावे भोगवटदार म्हणून समाविष्ट करण्यात आली आहेत. वस्तुत: वनक्षेत्राचे विभिन्न प्रकारानुसार त्यांना लागू असणारे कायदे/तरतूदी/ मा.न्यायालयांचे आदेश विभिन्न

आहेत. यास्तव वनक्षेत्राच्या प्रकारानुसार त्याची अचूक नोंद महसूली अभिलेखामध्ये “भोगवटदार” तसेच “इतर हक्क” सदरी आवश्यक तो शेरा नमूद होणे आवश्यक आहे. अन्यथा खाजगी व्यक्ती तसेच शासनाच्या महसूल व वन या दोन उपविभागांमध्ये सुध्दा न्यायालयीन प्रकरणे उद्भवण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सबब, मा.मुख्य सचिव महोदयांच्या निर्देशानुसार महसूली अभिलेख ७/१२ सदरी वन विभागाच्या नोंदी अद्यावत करण्यास्तव विशेष मोहिम राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन परिपत्रक :-</u>**

वन क्षेत्राबाबतच्या महसूली नोंदी अद्यावत नसल्याकारणाने वनक्षेत्राची खरेदी विक्री, अतिक्रमण यासारख्या बाबी होऊन न्यायालयीन प्रकरणे उद्भवत आहेत. त्याचप्रमाणे शासनाच्या महसूल व वन या दोन उप विभागांमध्ये विसंवाद निर्माण होऊन वनक्षेत्राबाबत मा.उच्च/सर्वोच्च न्यायालयाने विविध याचिकांच्या सुनावणीमध्ये वनजमिनींच्या नोंदींबाबत पारित केलेल्या निर्देशांचे पालन न होऊन मा.न्यायालयांचा अवमान होण्याची शक्यता निर्माण होत आहे.

हे पहाता, महसूली अभिलेखांमध्ये वनक्षेत्राची अचूक नोंद घेण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात यावी. वनक्षेत्राच्या वैधानिक दर्जानुसार/ प्रकारानुसार त्यांची नोंद ७/१२ महसूली अभिलेखात खालीलप्रमाणे घेण्यात यावी.

**परिशिष्ट अ**

| अ. क्र. | वनाचा प्रकार / वैधानिक दर्जा | वनाचा उप प्रकार | ७/१२ सदरी घ्यावयाच्या नोंदी | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | भोगवटदार सदरी | इतर हक्क | |
| १ | राखीव वन (Reserve Forest) | वन विभागाच्या ताब्यातील क्षेत्र | महाराष्ट्र शासन- वन विभाग - राखीव वन | भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम २३ ची बंधने लागू<br>“केंद्र शासनाच्या मान्यतेशिवाय वनेत्तर कामास बंदी” | भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम २० व इतर प्रचलित कायद्यांतर्गत अंतीमत: अधिसूचित |
| २ | | महसूल विभागाच्या पुर्वापार ताब्यातील क्षेत्र | महाराष्ट्र शासन- महसूल विभाग - राखीव वन | | |
| ३ | | महसूल वा अन्य विभागाद्वारे विविध प्रयोजनासाठी वाटप क्षेत्र (निर्वनीकरण न झालेले) | महाराष्ट्र शासन- राखीव वन तसेच<br>वाटप लाभार्थी - श्री. / श्रीमती . . . . | भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम २३ ची बंधने लागू<br>वाटप प्रयोजना व्यतिरिक्त वापर / हस्तांतरणास बंदी | |
| ४ | | प्रस्तावित राखीव वन | भा.व.अ. १९२७ कलम ४ अंतर्गत अधिसूचित राखीव | भा.व.अ. १९२७ च्या कलम ५ ची बंधने लागू. | भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ४ अंतर्गत अधिसूचित |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वन | | क्षेत्रावर तात्पुरत्या स्वरुपात नोंद घेणे आवश्यक आहे.<br>सदर क्षेत्राच्या वनजमाबंदी प्रक्रियेअंती कलम २० अंतर्गत अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर अ.क्र. १ नुसार प्रकरणपरत्वे सदरची नोंद परिवर्तीत होईल. |
| ५ | | विविध प्रयोजनासाठी वन संवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत वळतीकरण झालेले क्षेत्र | महाराष्ट्र शासन-राखीव वन<br>- - - - विभाग<br>(उदा. वन विभाग /महसूल विभाग) | केंद्र शासनाचे आदेश / वळतीकरणाचा शासन निर्णय नमूद करावा.<br>आणि ज्या प्रयोजनासाठी व ज्या यंत्रणेस वळती केले आहे ते नमूद करावे. | ज्या उद्देशासाठी वळतीकरण करण्यात आले आहे, त्या उद्देशाव्यतिरिक्त इतर कामांकरिता मनाई. |
| ६ | | वनहक्क (FRA) अधिनियमांतर्गत वनहक्कधारकांस दावा (वनपट्टे) मंजूर क्षेत्र | महाराष्ट्र शासन-राखीव वन<br>- - - - विभाग | वनहक्क मंजूरी आदेश क्र. व वनहक्क धारकाचे नाव व क्षेत्र<br>वारसाहक्काशिवाय हस्तांतरणास बंदी / विक्रीस बंदी | |
| ७ | संरक्षित वने (Protected Forest) | वन विभागाच्या ताब्यातील क्षेत्र | महाराष्ट्र शासन-वन विभाग-संरक्षित वन | “केंद्र शासनाच्या मान्यतेशिवाय वनेत्तर कामास बंदी” | भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम २९ व इतर प्रचलित कायद्यांतर्गत अंतीमत: अधिसूचित |
| ८ | | महसूल विभागाच्या पुर्वापार ताब्यातील क्षेत्र | महाराष्ट्र शासन-महसूल विभाग -संरक्षित वन | | |
| ९ | | वन विभागाकडून हस्तांतरीत केलेले व महसूल वा अन्य विभागाद्वारे विविध प्रयोजनासाठी वाटप केलेले क्षेत्र | महाराष्ट्र शासन-संरक्षित वन<br>. . . . विभाग<br>तसेच | वाटप प्रयोजना व्यतिरिक्त वापर / हस्तांतरणास बंदी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | (निर्वनीकरण न झालेले) | वाटप लाभार्थी - श्री. / श्रीमती . . . . | | |
| १० | | विविध प्रयोजनासाठी वन संवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत वळतीकरण झालेले क्षेत्र | महाराष्ट्र शासन- संरक्षित वन ---- विभाग (उदा. वन विभाग /महसूल विभाग) | केंद्र शासनाचे आदेश / वळतीकरणाचा शासन निर्णय नमूद करावा.<br>आणि ज्या प्रयोजनासाठी व ज्या यंत्रणेस वळती केले आहे ते नमूद करावे. | ज्या उद्देशासाठी वळतीकरण करण्यात आले आहे, त्या उद्देशाव्यतिरिक्त इतर कामांकरीता मनाई. |
| ११ | | वनहक्क (FRA) अधिनियमांतर्गत वनहक्कधारकांस दावा (वनपट्टे) मंजूर क्षेत्र | महाराष्ट्र शासन- वन विभाग- संरक्षित वन | वनहक्क मंजूरी आदेश क्र. व वनहक्क धारकाचे नाव व क्षेत्र<br>वारसाहक्काशिवाय हस्तांतरणास बंदी / विक्रीस बंदी | |
| १२ | खाजगी वने (Private Forest) | दि.२५.१०.१९८० पूर्वी महाराष्ट्र खाजगी वने संपादन अधिनियम, १९७५ कलम ६ अंतर्गत सूट न मिळालेले तसेच कलम २२-ए अंतर्गत पुनस्थापित न झालेले चौकशीवर प्रलंबित क्षेत्र | महाराष्ट्र शासन- मानीव राखीव वन | संबंधित खातेदाराचे नाव | भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ३५ नुसार केलेली कार्यवाही व त्यानुसार महाराष्ट्र खाजगी वने संपादन अधिनियम, १९७५ नुसार संपादित झालेले क्षेत्र |
| १३ | | दि.२५.१०.१९८० पूर्वी उक्त कलम २२-ए अंतर्गत पुन:स्थापित झालेले क्षेत्र | संबंधित खातेदाराचे नाव | "वने" व "केंद्र शासनाच्या मान्यतेशिवाय वनेत्तर कामास बंदी"<br>पुर्नस्थापना आदेश क्र. व दिनांक | |
| १४ | | दि.२५.१०.१९८० नंतर केंद्र | संबंधित खातेदाराचे नाव | "वने" व "केंद्र शासनाच्या | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | शासनाच्या मान्यतेने कलम २२-ए अंतर्गत पुन:स्थापित झालेले क्षेत्र | | मान्यतेशिवाय वनेत्तर कामास बंदी”<br>पुर्नस्थापना आदेश क्र. व दिनांक / केंद्र शासनाच्या मान्यतेचा क्र. व दिनांक | |
| १५ | | कलम २२-ए अंतर्गत अंतिमत: शासननिहीत क्षेत्र | महाराष्ट्र शासन-राखीव वन | पुर्नस्थापना आदेश क्र. व दिनांक. | |
| १६ | | अंतिमत: पुन:स्थापित क्षेत्रावर वनेत्तर कामाकरिता वन संवर्धन व संरक्षण अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झालेले क्षेत्र | संबंधित खातेदाराचे नाव | “वने” व<br>“केंद्र शासनाच्या मान्यतेशिवाय वनेत्तर कामास बंदी”<br>त्यासह<br>केंद्र शासनाचे आदेश/ वळतीकरणाचा शासन निर्णय नमूद करुन ज्या प्रयोजनासाठी वळती केले आहे ते नमूद करावे. | ज्या उद्देशासाठी वळतीकरण करण्यात आले आहे, त्या उद्देशाव्यतिरिक्त इतर कामांकरिता मनाई. |
| १७ | वनसदृश्य क्षेत्र (Identified forest) | | संबंधित खातेदाराचे नाव | “वनसदृश्य क्षेत्र”<br>मा.सर्वोच्च न्यायालयाचे दि.१२.१२.१९९६ चे आदेश लागू<br>“केंद्र शासनाच्या मान्यतेशिवाय वनेत्तर कामास बंदी” | मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.१२.१२.१९९६ च्या आदेशानुसार राज्यातील वनसदृश्य क्षेत्राची माहिती शासनाद्वारे मा.सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आली आहे.<br>सदर वनसदृश्य क्षेत्रावरील वनेत्तर कामास (जसे की, वृक्षतोड, अकृषीक प्रयोजनासाठी वापर इ.) वन संवर्धन अधिनियम, १९८० नुसार केंद्र शासनाची पूर्व परवानगी बंधनकारक आहे. |
| १८ | | वनेत्तर कामाकरिता वन संवर्धन | संबंधित खातेदाराचे नाव | “वनसदृश्य क्षेत्र” | ज्या उद्देशासाठी वळतीकरण करण्यात |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यास | | "मा.सर्वोच्च न्यायालयाचे दि.१२.१२.१९९६ चे आदेश लागू"<br>"केंद्र शासनाच्या मान्यतेशिवाय वनेत्तर कामास बंदी"<br>त्यासह केंद्र शासनाचे आदेश / वळतीकरणाचा शासन निर्णय नमूद करुन ज्या प्रयोजनासाठी वळती केले आहे ते नमूद करावे. | आले आहे, त्या उद्देशाव्यतिरिक्त इतर कामांकरीता मनाई. |
| १९ | झुडपी जंगल | वन विभागाच्या ताब्यातील | वरील रकाना क्र. १, ४, ५, ७ व १० मध्ये दिलेल्या सूचनांनुसार प्रकरणपरत्वे नोंदी घेण्यात याव्यात. | | |
| २० | झुडपी जंगल | महसूल विभागाच्या ताब्यातील | झुडपी जंगल | | मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१२.१२.१९९६ चे आदेश व झुडपी जंगलासंदर्भात आय.ए.क्र.१२४६५/२०१५ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाचे दि.२२.०५.२०२५ व दि.२५.०८.२०२५ चे आदेश लागू राहतील. |
| २१ | अवर्गीकृत वने (Unclassified) | - | वन विभाग - अवर्गीकृत वने | | वन विभागाच्या ताब्यात असलेले तथापि, अधिसूचित नसलेल्या क्षेत्रास अवर्गीकृत वने असे म्हणतात. |
| २२ | कांदळवन (Mangroves) | शासकीय क्षेत्र (संरक्षित / राखीव वन म्हणून अधिसूचित) | वरील रकाना क्र. १, ४, ५, ७ व १० मध्ये दिलेल्या सूचनांनुसार नोंदी घेण्यात यावा. | | मा.उच्च न्यायालयाचे कांदळवनाचे संरक्षण व संवर्धनासाठी अंतरीम दि.६.१०.२००५ व अंतीम |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | दि. १७.०९.२०१८ चे आदेश लागू राहतील. |
| २३ | | खाजगी क्षेत्र | संबंधित खातेदाराचे नाव | खाजगी कांदळवन<br><br>“केंद्र शासनाच्या मान्यतेशिवाय वनेत्तर कामास बंदी” | मा.उच्च न्यायालयाचे कांदळवनाचे संरक्षण व संवर्धनासाठी अंतरीम दि.६.१०.२००५ व अंतीम दि. १७.०९.२०१८ चे आदेश लागू राहतील. |

**२. सदर विशेष मोहिम राबविताना खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबण्यात यावी-**

२.१ वन विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयांव्दारे (वनपरिक्षेत्र अधिकारी स्तरावर) त्यांच्या अधिपत्याखालील वन क्षेत्राच्या अचूक नोंदी महसूली अभिलेख ७/१२ सदरी आहेत किंवा कसे, या बाबत संबंधित तलाठी/तहसिलदार यांच्या अभिलेखासमवेत ताळमेळ घेऊन तपासणी करण्यात यावी. वर नमूद प्रकारांमधील ज्या वनक्षेत्रांच्या महसूली अभिलेखामध्ये उक्त प्रमाणे नोंदी आढळून येणार नाहीत, अशा क्षेत्रांची यादी तयार करण्यात येऊन संबंधित उप वनसंरक्षक यांना सादर करावी.

२.२ संबंधित उप वनसंरक्षक यांनी प्राप्त झालेल्या उक्त यादीतील क्षेत्र वनक्षेत्र आहे किंवा कसे, याबाबतची खातरजमा वन विभागाच्या अभिलेखांवरुन करावी, व सदर यादीतील क्षेत्राच्या महसूली अभिलेखामध्ये वनाच्या अनुषंगाने नोंदी घेण्यास्तव परिपूर्ण प्रस्ताव उचित कागदपत्रांसह जिल्हाधिकारी यांना सादर करावा.

२.३ वन विभागाव्दारे महसूली अभिलेखातील दुरुस्तीकरिता जिल्हाधिकारी कार्यालयांना प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर आवश्यकतेनुसार क्षेत्रिय वन अधिकारी यांच्याव्दारे ताळमेळ करुन महसूली अभिलेखात विहीत कार्यपध्दतीने संबंधित वनक्षेत्राच्या ७/१२ अभिलेखामध्ये उक्त नमूद केल्यानुसार वनाच्या प्रकाराप्रमाणे नोंदी घेण्याची कार्यवाही करावी.

२.४ उक्त प्रमाणे महसूली अभिलेखामध्ये नोंद घेण्याची कार्यवाही **दि. ३१ मे, २०२६ पर्यंत** पूर्ण करण्यात यावी. त्याकरिता आवश्यकतेनुसार जिल्हाधिकारी यांनी विशेष मोहिम राबविण्याचे नियोजन करावे.

२.५ सद्यस्थितीत पूर्वापार योग्य नोंदी न घेतलेल्या क्षेत्रांच्या नोंदीच्या अनुषंगाने विशेष मोहिम राबविणे अभिप्रेत आहे. तथापि, वनक्षेत्रामध्ये विविध कारणांनी (जसे की, CA Land, भा.व.अ., १९२७- कलम ४/२०, खाजगी वन संपादन प्रक्रिया) सातत्याने वाढ होत आहे. हे पहाता, वनक्षेत्राच्या महसूली अभिलेखामध्ये नोंदी घेण्याची कार्यवाही निरंतर सुरु राहणार आहे. सबब, पूर्वापार नोंदी न घेतलेल्या क्षेत्रांव्यतिरिक्त अन्य नव्या वनक्षेत्राच्या नोंदींच्या अनुषंगाने महसूली अभिलेखामध्ये ७/१२ सदरी उचित नोंदी घेण्याच्या कार्यवाहीचा त्रैमासिक प्रगती अहवाल संबंधित विभागीय आयुक्त यांनी शासनास सादर करावा.

२.६ वनक्षेत्राच्या नोंदी घेण्यासाठी क्षेत्रिय वन अधिकारी आणि महसूली अधिकारी यांनी समन्वय ठेवून पाठपुरावा करावा व नोंदी घेण्याची कार्यवाही पूर्ण झाल्याची खातरजमा करावी. त्याबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) व जिल्हाधिकारी यांच्यासह वेळोवेळी आढावा घ्यावा.

२.७ ज्या ठिकाणी विसंगती / संभ्रम आढळून येत असेल, त्या ठिकाणी संबंधित जिल्हाधिकारी आणि उप वनसंरक्षक यांच्यास्तरावर संयुक्त बैठका आयोजित करुन अभिलेखातील नोंदी अद्यावत करण्याची नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

३. त्याचप्रमाणे याव्यतिरिक्त पूर्वापार महसूल विभागाच्या ताब्यातील अधिसूचीत वनक्षेत्र जे महसूल विभागाकडून विविध प्रयोजनासाठी वाटप करण्यात आलेले नाही, ते क्षेत्र वन विभागाकडे परत करण्याच्या सूचना वेळोवेळी मा. सर्वोच्च न्यायालय तसेच शासन स्तरावरुन देण्यात आल्या आहेत. उक्त प्रमाणे वन क्षेत्राच्या नोंदींची कार्यवाही करताना, जे वनक्षेत्र वाटप न करता महसूल विभागाच्या ताब्यात राहीले असल्याचे निदर्शनास येईल, असे अतिक्रमण विरहीत वनक्षेत्र वन विभागास तातडीने हस्तांतरीत करण्यात यावे. त्याचप्रमाणे वन विभागाने महसूल विभागाव्दारे हस्तांतरीत क्षेत्र तातडीने ताब्यात घेऊन त्यावर रोपवन, संवर्धन इ. कामे सुरु करुन त्यांचा कार्य आयोजनेमध्ये (Working Plan) समावेश करावा.

४. उक्त प्रमाणे वनक्षेत्र ज्याला वन संवर्धन व संधारण अधिनियम, १९८० च्या तरतूदी लागू होतात, असे क्षेत्र पीएम-गतिशक्ती (PM-GATISHAKTI) पोर्टलवर अद्यावत करावे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४२३१८३२४७४०१९ आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

APARNA SUHAS UPASANI

Digitally signed by APARNA SUHAS UPASANI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Dept, 2.5.4.20=130A2EE40839D75FF18E93244499097828091EF8E09F856D6E8F0C403254F40A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=00DDF81FCF3DFD3E814E1C6D5D5D1249D28D65601EB04ECDFF837C158CB2ED4C, cn=APARNA SUHAS UPASANI
Date: 2026.04.23 18:34:10 +05'30'

(अपर्णा उपासनी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत :**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
४) मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
५) मा. मंत्री (आदिवासी विकास), यांचे खाजगी सचिव
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
७) अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव (आदिवासी विकास), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
११) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१२) सर्व विभागीय आयुक्त.
१३) आयुक्त, जमाबंदी, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव), (सर्व)
१५) सर्व जिल्हाधिकारी
१६) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
१७) वनसंरक्षक / उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक/वन्यजीव), (सर्व)
१८) निवडनस्ती.